# नमुना करारपत्र

सदर करारपत्र हे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या वतीने अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असणाऱ्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचे, व्यवस्थापक यांच्याबरोबर करण्यात येत असून, यापुढे त्यांना शिपुप्रम असे संबोधण्यात येईल. (ज्याचा शब्दप्रयोगाचा संदर्भ प्रतिकूल नसेल असा उत्तराधिकारी अणि अभिहस्तांकरण करणारा असेल) असा एक पक्ष आणि ------------ यापुढे पुरवठादार संस्था जीचे नोंदणीकृत कार्यालय ------------- (ज्यांचा शब्दप्रयोगाचा संदर्भ प्रतिकूल नसेल असा उत्तराधिकारी वारस कार्यकारी प्रशासन कायदेशीर प्रतिनिधी आणि मान्यता प्राप्त अभिहस्तांकनकर्ता) हा दुसरा पक्षकार.

ज्याअर्थी, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचे महाव्यवस्थापक, ५वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे(पूर्व) मुंबई-४०० ०५१ यांनी शिपुप्रम (खुद्द) यांच्या कार्यालयासाठी मासिक तत्वावर वाहनचालकासह वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत शिपुप्रमसाठी आवश्यक असलेले वाहनचालकासह विर्निदिष्ट वाहन मासिक दराने पुरवठा करण्याबाबतचे दि.--------- ते दि.------- या साधारणपणे ६ महिन्यांच्या कालावधीसाठी मासिक कंत्राटी भाडेतत्वावर वाहनचालकासह वाहने पुरविण्यासाठी शिपुप्रमने विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य करुन स्विकारलेले आहे.

त्याअर्थी, आता सदर करारपत्र करण्याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती साक्षीदारांच्या समोर सहमती झाली:

**सर्वसाधारण अटी व शर्ती:**

१. भाडेतत्वावर वाहनचालकासह वाहने पुरविण्याचे कंत्राट आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून साधारणपणे ६ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील.

२. करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

३. पुरविण्यात येणारी सर्व वाहने ही 'टी' परमिट जानेवारी २०१५ नंतरची असणे आवश्यक आहे. तसेच सर्व वाहनांची नोंदणी कागदपत्रे, आर.सी.बुक, टॅक्स बुक इ. तपशिल स्वयं साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक राहील.

४. भाडेतत्वावर पुरविण्यात येणाऱ्या वाहनांचा वाहनचालकांच्या अनुज्ञप्तीसह सर्व तपशिल सादर करणे आवश्यक राहील.

५. वाहनचालकांसोबत त्यांच्या वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.

६. उपलब्ध करुन देण्यात येणारा वाहनचालक भारतीय नागरीक असावा. तसेच त्यास मराठी लिहिता/वाचता/बोलता येणे आवश्यक आहे. वाहनचालकास अनुज्ञप्ती प्राप्त केल्यानंतरचा मुंबईत वाहन चालविण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

७. वाहनचालकाचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

८. सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा/ प्रवृत्तीचा नसावा.

९. वाहनास अपघात झाल्यास व दुर्दैवाने वाहन चालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्च अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शिपुप्रम कार्यालयाचे असणार नाही.

१०. सदर वाहनांच्या वापराबाबत लॉग बुक तयार करणे आवश्यक राहील. सदर लॉग बुकमधील सर्व नोंदी व वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावासहीत स्वाक्षरी त्या-त्या वेळी घेणे आवश्यक राहील. या लॉगबुकच्या दोन प्रती सहाय्यक व्यवस्थापक / व्यवस्थापक (प्रशासन), शिपुप्रम यांच्याकडे महिना पूर्ण झाल्यावर ४ दिवसात सादर करणे आवश्यक राहील.

११. पुरविण्यात येणा-या वाहनाचा वाहन क्रमांक, वाहनचालकाचे नाव, संपर्क क्रमांक इत्यादी माहिती सहाय्यक व्यवस्थापक / व्यवस्थापक (प्रशासन)/शिपुप्रम यांच्याकडे नियमितपणे देणे बंधनकारक राहील. काही कारणास्तव नेहमीचे वाहन बदलण्यात आले तरीही त्याच लॉग बुकमध्ये नवीन वाहनाचा क्रमांक व वाहन चालकाचे नाव यांच्या नोंदी करुन तसे शिपुप्रम कार्यालयास कळविणे आवश्यक राहील.

१२. वाहन वापराबाबत महिन्याच्या एकूण किमान ३०० तासाच्या पुढील वाहन वापराचा वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता मोजण्याकरीता विचार करण्यात येईल.

१३. वाहनांची किलोमीटर गणना प्रत्यक्ष वाहन वापर केल्याचे मोजण्यात येतील. केवळ रात्रीच्या वेळी अधिकाऱ्यांना निवासस्थानापर्यंत सोडावे लागल्यास परतीच्या प्रवासाचे मुंबईतील निवासस्थांनाच्या बाबतीत जास्तीत जास्त ८ किलोमीटर व मुंबईबाहेरील निवासस्थांनाच्या बाबतीत १५ कि. मी. जमेस धरण्यात येतील.

१४.एकदा ठरविण्यात आलेले दर हे आगामी ६ महिन्यांसाठी राहतील. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. सेवा आवश्यक तसेच समाधानकारक आढळल्यास व व्यवहार्य ती सेवा त्याच अटी व शर्ती व दरानुसार पुढील एक वर्षाकरीता चालू ठेवण्याचा विचार केला जाईल.

१५.पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक न वाटल्यास एक महिन्याची पूर्वसूचना देऊन आपल्या एजन्सीसोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्याचे अधिकार कंपनीने राखून ठेवले आहेत.

१६. वाहने रोज स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. वाहन वापराच्या कालावधीत वाहनविषयी कराची रक्कम, विम्याची रक्कम, वाहनचालकाचे वेतन आणि भत्ते, वाहन दुरुस्ती खर्च, इंधन खर्च इ. सर्व खर्च कंत्राटदाराने स्वत: करावयाचा आहे. प्रत्यक्षात कार्यालयामार्फत कार्यालयीन वेळेत वाहन वापर करताना टोल शुल्क / पार्किंग शुल्क कार्यालयामार्फत अदा केले जाईल.

१७.एखाद्या दिवशी वाहन उपलब्ध न झाल्यास, किंवा वाहन नादुरुस्त झाल्यास त्वरित पर्यायी वाहनांची सोय करुन देणे हे आपल्या एजन्सीला बंधनकारक राहील, अन्यथा त्या दिवसाची अनुपस्थिती धरण्यात येईल. अनुपस्थितीच्या प्रत्येक दिवसाबद्दल रु.१,०००/- प्रमाणे रक्कम वाहन पुरवठादार एजन्सीच्या देयकातून वसूल करण्यात येतील. तसेच उशिरा आल्यास प्रत्येक तासाबद्दल व त्यांच्या भागाबद्दल प्रत्येकी रु.१००/- वसूल करण्यात येतील. वाहनचालकाने संपर्कासाठी प्रतिसाद न दिल्यास प्रत्येक घटनेबद्दल अतिरिक्त रु.५०/- वसूल करण्यात येतील.

१८.ज्या अधिकाऱ्यांसाठी वाहन सेवा पुरविण्यात येत आहे त्या अधिकाऱ्यांशी तसेच वाहनचालक यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून रोजच्या रिपोर्टिंगची वेळ व ठिकाण यांची खात्री करुन घेणे बंधनकारक राहील. याबाबत अधिकारी वर्गाकडून देखिल दक्षता घेण्यात येईल. ज्या अधिकाऱ्यांसाठी वाहन सेवा पुरविण्यात येत आहे, ते अधिकारी रजेवर असले तरीही संबंधित

वाहनाबाबत सहाय्यक व्यवस्थापक / व्यवस्थापक (प्रशासन) यांच्याकडे उपस्थिती कळविणे आवश्यक राहील.

१९. (२) ई-निविदेतील वाहन प्रकार क्र. २ हे महिन्यातील शासकीय साप्ताहिक सुट्ट्या व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी आवश्यक असणार नाही, हे विचारात घेऊन ई-निविदा क्रमांक शिपुप्रम/वाहन/निविदा/ प्र.क्र.१२४/२०२२, दि.२८ एप्रिल, २०२२ नुसार प्रक्रियेद्वारे निश्चित झालेली रु.----------/- ही ठोक रक्कम वरील इतर अटींची पूर्तता झालेली असल्यास अदा करण्यात येईल. तसेच १२०० किलोमीटर पेक्षा जास्त किलोमीटर करीता वाहन वापरण्यात आले असल्यास त्यानुसार पुढील किलोमीटरसाठी देण्याची रक्कम किलोमीटर नमूद करुन परिगणना करावी.

२०. वाहने शासकीय साप्ताहिक सुट्टी अथवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रशासकीय कारणास्तव आवश्यक झाल्यास उपलब्ध करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. त्या दिवसाचा केवळ वाहनचालकाचा अतिकालिक भत्ता रु. ८०/- प्रती तास प्रमाणे देण्यात येईल.

२१. वरील अटी व शर्तीचे योग्य प्रकारे पालन करणे आपल्या एजन्सीस बंधनकारक राहील. अन्यथा वरील अ.क्र. १७ नुसार दंडात्मक किंवा इतर कार्यवाही करण्याचा अधिकार कंपनीकडे असेल.

२२. सदरहू निवड केलेले वाहन/वाहने प्रत्येक वेळी अथवा कोणत्याही क्षणी शिपुप्रमची प्रशासकीय आवश्यकता विचारात घेऊनच भाडेतत्वावर घेण्यात येईल/येतील अथवा एक महिन्याची पूर्वसूचना देऊन भाडेतत्वावर घेण्याचे बंद करण्यात येईल. त्याबाबतची कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोणत्याही कारणास्तव जादा वाहन आकस्मिकपणे घेण्याची आवश्यकता शिपुप्रमला भासल्यास व सदरहू निविदा प्रक्रियेतील दरापेक्षा कमी दराने उपलब्ध होत असल्यास ते उपलब्ध करण्यात येईल. त्याबाबतीत कंत्राटदाराचा संबंध असणार नाही

| | |
|---|---|
| (          ) | (          ) |
| व्यवस्थापक (प्रशासन) | पक्षकार |
| शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित | पुरवठादार संस्थेचे नांव |

साक्षीदार: १) --------------          साक्षीदार: १) ----------